# पाश्चात्य सुधारणांचा भारतीय सामाजिक संस्थांवरील प्रभाव

**प्रा. डॉ. संदीप रामराव गोरे**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख
श्री. योगानंद स्वामी महाविद्यालय, वसमतनगर
जि. हिंगोली – ४३१ ५१२

उत्तर भारतीय समाजाची प्राचीन काळी जी समाजरचना होती, त्यात वेगवेगळ्या काळात परिवर्तन घडून आले आहे. परंतु एकोणिसाव्या विसाव्या शतकात भारतीय समाजव्यवस्थेत फार मोठ्या प्रमाणात व वेगाने परिवर्तन घडून आल्याचे दिसते. सामाजिक परिवर्तनात मुलभूत अर्थाच्या दृष्टीने समाजातील बदल अपेक्षित असतो व तो रचनात्मक बदल असावा.

पाश्चिमात्यांशी संबंध आल्यावरच भारताच्या आधुनिकीकरणाला सुरुवात झाली. अफगाण, मोगल, तुर्क, मुस्लीम अशी अनेकांची आक्रमणे या देशावर झाली, पण त्यातुन लुटमार दंगे व धार्मिक छळ यापेक्षा जास्त काही परिणाम झाले नव्हते. परंतु बाबर हुमायुन यांच्या काळात 15व्या शतकात परकीयांनी राज्यसत्ता स्थापन केली व सांस्कृतिक बदल झपाट्याने झाला. फ्रेंच व तद्नंतर ब्रिटीशांनी भारतात प्रवेश केला. पण व्यापाराशिवायच्या इतर बाबतीत त्यांनी हस्तक्षेप केला नव्हता. 18 व्या शतकानंतर ते भारताला 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत ब्रिटीशांचा भारतीयांशी विशेष संबंध आला व भारतीय समाजरचनेत व संस्कृतीत महत्वपूर्ण स्थित्यंतरे घडून आली. पाश्चिमात्य संस्कृती, शिक्षण, तंत्रज्ञान व या विषर्थीचे संबंध यामध्ये भारतीय संस्थांवर परिणाम झाला. भारताचा इतिहास व परंपरा अतिशय प्राचीन असुनही भारतीय समाजात हे बदल घडुन आले. संपर्काबरोबर जुन्या परंपराही जास्त दृढ झाल्या व परंपरा आणि आधुनिकीकरण यांच्यातील संघर्ष सुरू झाला.

1857 च्या क्रांतीनंतरच्या उठावामुळे सर्व भारतात सत्ता स्थापन करण्याकडे इंग्रजांचे लक्ष होते. भारतात अनेक जाती, उपजाती, शिक्षित अशिक्षित, ग्रामीण जनता व त्यांच्या वेगवेगळ्या परंपरा अस्तित्वात होत्या. ब्रिटीशांनी व धर्मोपदेशकांनी त्यांचा सविस्तर अभ्यास केला. सामाजिक रचना व आधुनिक संस्कृतीचे नवे परिमाण ब्रिटीशांच्या काळात झाले. पाश्चात संस्कृतीचेच प्रतिनिधीत्व ब्रिटीशांच्या राजवटीत केले गेले. फ्रेंच राज्यकांती, ब्रिटनमधील औद्योगिक कांती यांचे औद्योगिक परिणाम या सर्वांचे पडसाद भारतात आले. नविन शिक्षण पद्धती, आर्थिक बदल, नव्या राजकीय संस्थांचे कार्यक्रम या सर्व गोष्टी

भारतात ब्रिटीश राज्यकर्त्यांनी दर्शविल्याप्रमाणे झाल्या. तसेच स्वातंत्र्य मिळाल्यावरही ब्रिटीशांनी सुरू केलेल्या अनेक प्रवृत्ती भारत सरकारने चालु ठेवल्या. भारतातील पारंपारिक समाजाला आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, भाषिक व वहातुक अशा अनेक घटकांनी आधुनिक बनविले.

(१) ब्रिटीश राजवटीत व स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक आर्थिक शक्तींचा उपयोग करून घेतला गेला. प्रथम जमीन महसुलीच्या बाबतीत सुधारणा झाल्या. ज्या लोकांना आपल्या हातात जमीन राखणे परवडत होते अशांना व प्रत्यक्ष जो कसेल त्याचीच जमीन ठेवण्याचा कायदा अस्तित्वात आला. नव्या महसुल पद्धतीने सरकारी उत्पन्नात नियमितपणा आला. सावकारी, जमीनमालक व व्यापारी निर्माण झाले. भारतातून कच्चा माल नेऊन त्याचा पक्का माल आयात करण्याच्या ब्रिटीशांच्या धोरणाचा परिणाम म्हणुन देशी उद्योगांना मोठा धक्का बसला. देशी उद्योगांना संरक्षण नव्हते. परंतु स्वातंत्र्यानंतरच्या काळात ग्रामीण उद्योग व हस्त व्यवसायास चालना मिळाली. कापड, कायद, ज्युट, साखर, जहाजे यांचे कारखाने सुरू झाल्याने औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू झाली व तिला वेगाने चालना मिळाली. रोजगार नव्याने उपलब्ध झाले. कुशल कारागिरांना काम मिळाले.. श्रमविभाजनाकडे लोकांचा कल वाढला. वंशपरंपरगत व्यवसायाऐवजी कौशल्य, हुषारीच्या जोरावर नव्य संधी उपलब्ध झाल्या. उत्पादन वाढ होण्याकडे लक्ष दिले गेले. स्त्रीयांची शिक्षणाची ओढ आणि संधीचा फायदा घेण्याची वृत्ती वाढली व स्त्रीयांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्या जास्त प्रयत्नशील बनल्या. अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीयांच्या घरच्या जबाबदाऱ्यांचे प्रमाण कमी होऊ शकले नाही. त्यामुळे कुटूंबांची आणि बाहेरच्या कामाची अशी दुहेरी जबाबदारी त्यांच्यावर पडली.

(2) लॉर्ड मेकॉलेच्या काळापासून (1832 पासुन) नव्या पद्धतीच्या शिक्षणाची सुरूवात आली. ब्रिटीश शिक्षणाचा प्रसार घडवण्याचा हेतु चांगला असला तरी त्यामध्ये राज्यकारभारासाठी माणसे तयार करण्याचा वबुद्धीमान वर्गावर नियंत्रण मिळवण्याचा हेतुही होताच. 1885 पासून राष्ट्रीय सभेच्या उदयापासून स्वातंत्र्याकरीता लढा सुरू झाला. परवेशनमन करून शिक्षण घेण्याकडे युवकांचा कल झाला. अशा प्रकारच्या शिक्षणापासून ज्ञानाच्या कक्षा संवावल्या. शैक्षणिक वातावरणात अधिक मोकळेपणा आल्याने सामान्य व्यवहारातील स्पृश्यास्पृश्यतेचे प्रमाण कमी झाले. स्त्री शिक्षणाचाही प्रसार झाला. काही समाजसुधारकांना व नवीन शिक्षण घेणाऱ्या पिढीला ब्रिटीशांशी संबंध ठेवणे हे अतिशय मानाचे वाटू लागले व नविन शिक्षित पिडीमुळे ब्रिटीश व पाश्चिमात्य समाज हा संदर्भगट म्हणून महत्वाचा वाटु लागला त्यामुळे त्यांचे अनुकरण करता करता कपडे, जेवण, खाणे पिणे, भाषा व इतर व्यवहारात सुद्धा आदर्श त्यांचा मानू

लागले आचार विचारांचे नियम बदलले. परिणामी वैचारिक परिवर्तनही सुरू झाले. परकीयांची नक्कल करणे हेच प्रमुख ध्येय त्यांनी नजरेसमोर ठेवले, डॉ. श्रीनिवास यांनी संस्कृतीकरणाची प्रक्रिया स्पष्टपणे मांडतांना सामान्यतः हिंदुच्या वर्णव्यवस्थेत सर्वोच्च स्थानी असलेल्या ब्राम्हण जातीचे अनुकरण करण्याची कनिष्ठ जातीच्या लोकांची वृत्ती असते. पाश्चात्य समाजाच्या बाबतीतही असेच अनुकरण करण्याची भारतीयांनी वृत्ती दर्शविली.

(3) राजकीय दृष्ट्या भारतात ब्रिटीशांची सत्ता होती. एक केंद्र सरकार व इतर इलाख्यांची व्यवस्था त्या केंद्राखाली असा एकछत्री अंमल होता. परंतु विविध राज्यमंडळे, लोकानियुक्तीने निवड झालेल्या मंत्र्यांची मंत्रीमंडळे अश्या गोष्टींवर आधारलेला लोकशाहीप्रधान राज्य कारभार याच काळात सुरू झाला. मॅटिम्यु चेम्सफोर्ड भोर्ले मिंटो यांनी सुधारणा केल्या व त्यामुळे भारतीयांना राज्य कारभारातही महत्व व स्थान मिळाले. नंतरच्या काळात सायमन कमीशन, राउंड टेबल कॉन्फरन्स आदी सुधारणा झाल्या व 1947 साली ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र्य दिले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात अस्तित्वात आलेल्या राज्यघटनेवर आणि राज्यव्यवस्थेवरही ब्रिटीश राज्यतंत्राची व ब्रिटनमधील राज्यकारभाराची छाप दिसते पंचायती राज्याच्या स्थापनेमुळे ग्रामीण व्यवस्थेलाही महत्व मिळाले. अशा रितीने लोकशाही तत्वे खेडोपाडयात जाऊन पोहोचली.

(4) कायदेमंडळे व झालेले नवे कायदे यामुळे परिवर्तन व सुधारणा झाल्या विवाहाचे वय वाढल्याने कुटूंबे लहान बनली, घटनेमध्ये वंश, जात, लिंग अशा कारणाने भेद न मानण्याचे घोषित केल्याने या नव्या मूल्यांचाही स्विकार झाला. समता, निधर्मी राज्याची कल्पना आणि संकटाच्या काळात एकजुटीच्या भावनेने रहाणे व प्रगतीवर विश्वास ठेवणे या सर्वांचा अनुभव जनतेला संकटाच्या काळात आला. परंपरागत अंधश्र वागण्यापेक्षा विज्ञानावर आधारित डोळस परंपरा सुरू झाली. मुलभूत हक्क जनतेला प्राप्त झाल्याने व्यक्तीमत्वाचा विकास साधला गेला.

(5) उद्योगधंद्यांची वाढ झाल्याने व ग्रामीण भागातील कारागीरीचा उपयोग करून विकसित होणाऱ्या ग्रामोद्योगामुळे शहरीकरणाची प्रक्रिया जास्त वेगवान झाली आहे. रोजगाराच्या निमित्ताने शहरात येणारे ग्रामीण विभागातले लोक अकुशल कामगार म्हणून राबु लागतात, अशा लोकांबरोबर त्यांची कुटूंबेही शहरात येतात. परिणामी शहरात मागणीपेक्षा मनुष्यबळाचा पुरवठा जास्त वाढतो. यातुन बेकारी, अर्धदिकारी व इतर अनेक सामाजिक समस्याही निर्माण होतात शहरातील चैनीच्या आयुष्यामुळे जनतेचे शेतीविषयीची आवड कमी झाली. शेतीमध्येही अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांकडेच त्यांचा कल होऊ

लागला अन्नधान्याची निर्मिती कमी होऊ लागली असता परावलंबित्व परत वाढते. भिलाई, बेंगलोर, राऊरकेला, दुर्गापूर, भोपाळ, तुर्भे अशा ठिकाणी नवीन औद्योगिक केंद्रे निर्माण झाल्यावर औद्योगिकरणास जास्त चालना मिळालेली दिसते. तार, टेलिफोन, दुरदर्शन, कॉम्प्युटर्स, इंटरनेट यासारख्या सुविधांमुळे जगाच्या विशालतेच्या मर्यादा कमी झाल्या. नवीन बी बियाणे जंतुनाशके याच्या विपूल प्रमाणातील वापराने व शेतीतही यंत्रांचा उपयोग करण्याकडे वाढता कल असतो. परिणामी सर्व क्षेत्रात प्रगतीचे वारे वाहू लागले.

याचबरोबचही ही गोष्ट मान्य करावी लागते की, शहरीकरणामुळे भौतिक संस्कृतीचा पाठपुरावा केला जातो. चैनीच्या वस्तूंचे उत्पादन जीवनावश्यक वस्तूंपेक्षा जास्त वाढले. काही वस्तु घरामध्ये असणे हे चैनीचे व प्रतिष्ठेचे प्रतिक मानले जाते व त्या नसल्या तर आपण सुखी नाही असे लोक समजतात ह्यांच्या खरेदीकडे कल वाढतो परिणामी नव्या समस्या उभ्या रहातात. शहरातील वाढत्या गरजा व त्यासाठी असणारा अपुरा पुरवठा यामुळे रुपयाची क्रयशक्ती कमी झाली व शहरी जीवनमान उंचावले तरी त्याकरीता पैसा जास्त लागतो. शेवटी चलनवाढ होते आणि महागाईही वाढते

भारतीय विचारवंत एम. एम. श्रीनिवास यांनी संस्कृतीकरण व पाश्चिमात्यीकरण या दोन संकल्पना मांडलेल्या दिसतात. त्यांच्या मते जातीव्यवस्थेचे स्वरूप हे तत्वतः साचेबंद असले तरी या व्यवस्थेतही सामाजिक गतीशीलतेला वाव असतो. कनिष्ठ जातीचे लोक वरीष्ठ जातीच्या आचारविचार प्रणालीचे अनुकरण करतात आणि आपले सामाजिक स्थान उंचीचे गाठू शकतात. असे कनिष्ठ जातीचे उर्ध्वगामी सामाजिक गतीमत्व म्हणजे संस्कृतीकरण होय. आर्थिक संपन्नता ही संस्कृतीकरणाची पूर्वावश्यक बाब नाही. राजकीय सत्तेची व्याप्ती, शिक्षण नेतृव आणि वरिष्ठ दिशेने गतीमान होणारे अनेक घटक असतात, औद्योगिकरण, साक्षरतेचा प्रसार, विकासाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचणे, व्यावसायिक गतीशीलता अशा अनेक कारणांमुळे भारतातसांस्कृतीकरणाची प्रक्रिया गतीमान झाली आहे. सामाजिक दर्जा वाढवण्यासाठी आज असे दिसते की, खालच्या जाती सळी व धार्मिक विधी राहणीमान पोशाख या आणि अशा बाबतीत वरच्या जातीचे अनुकरण करीत असतात. वरच्या जातींमधील गट संदर्भ गटाचे माध्यमातुन पाश्चिमात्यांचे अनुकरण करीत असतात.

संस्कृतीकरणाबरोबरच पाश्चिमात्यीकरणाच्या संकल्पनेबद्दल सांगताना एम. एन. श्रीनिवास यांनी असे प्रतिपादन केले आहे की, या संकल्पनेचा संबंध तंत्रविद्या, संस्था, विचारप्रणाली, मूल्ये यांच्यातील परिवर्तनाशी येतो. पाश्चात्य समाजाशी येणाऱ्या दीर्घकालीन सांस्कृतिक संपर्कामुळे एखाद्या अपाश्चिमात्य समाजात तंत्रविद्यात्मक संस्थात्मक मूल्यात्मक बदल घडून येतो त्याला पाश्चिमात्यीकरण म्हटले जाते.

म्हणजेच अपाश्चिमात्य समाजाने पाश्चिमात्य समाजाच्या आचार विचारप्रणालीचा व तंत्रविद्येचा अंगिकार करणे म्हणजे पाश्चिमात्यीकरण होय. भारतात सुमारे दोन शतके ब्रिटीशांची सत्ता होती. या कालावधीत भारतीय समाजात घडून आलेले तंत्रविद्यात्मबद्दल शैक्षणिक संस्थांची स्थापना, राष्ट्रवादाचा आणि नवीन राजकीय संस्कृतीचा उदय हे पाश्चिमात्यीकरणाचे परिणाम मानता येतील यावरून भारतीय संदर्भात असे म्हणता येईल की. पाश्चिमात्यीकरण म्हणजे पाश्चात्य समाजाचे सर्वांगानी अनुकरण व अनुसरण. ब्रिटीशांच्या काळामध्ये पाश्चिमात्यीकरण या प्रक्रियेला भारतात प्रारंभ झाला असे मानता येईल. लोकसंख्येच्या एका गटाने पाश्चात्य पोशाख, खाद्यपदार्थ, अन्न, शिष्टाचार, भाषा यांचा अंगिकार केला तर दुसऱ्या गटाने पाश्चात्यांचे ज्ञान व शास्त्र, साहित्य व वाडमय यांचा स्विकार केला. उदा ब्राम्हणांनी पाश्चात्यांचा पोशाख, त्यांची शिक्षणप्रणाली. साधने स्विकारली परंतु त्यांचे खाणे पिणे, शिकार, नृत्य अशुद्धतेच्या व पावित्र्याच्या कल्पनांचा त्याग ह्या गोष्टी स्विकारल्या नाहीत. अशा रितीने ह्या प्रक्रियेचे स्वरूप व गती विभागापरत्वे वेगवेगळी राहिलेली असली तरी आज पाश्चिमात्यीकरण हे अधिक व्यापक आणि गतीमान बनलेले आहे असे दिसुन येते. मिश्र शिक्षणामुळे स्त्रीया अधिक धीट व चौकस बनल्या. विवाह कुटूंबे, जाती या संस्थात संरचनात्मक बदल झाले.

पाश्चात्य शिक्षणाने भारतीयांना नवी जीवनदृष्टी दिली. लोकांना अधिकारांची व कर्तव्यांची नवी जाणीव झाली. बुद्धीवाद व्यक्तीवाद, समानता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता यांना अधिक महत्व प्राप्त झाले. शास्त्रीय शोधांचा स्विकार करून भौतिक कल्याण साधण्याकडे कल वाढला. सामाजिक प्रगतीच्या मार्गातले अडथळे ठरणारे पारंपारीक श्रद्धा व आचार विधी यांचा त्याग केला जातो व नवीन वर्तनप्रणाली मान्य केली जाते. राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली. राजकीय संरचनेला नवा आकार प्राप्त झाला.

श्रीनिवास यांनी आधुनिकीकरणाच्या कल्पनेच्या तुलनेत पाश्चिमात्यीकरणाच्या कल्पनेला महत्व दिले आहे तर योगेंद्र सिंह यांच्या मते आधुनिकीकरण या कल्पनेला अधिक महत्व आहे. त्यांच्या मतानुसार पाश्चिमात्यीकरणाची कल्पना सापेक्ष (व्यक्तीनिष्ठ) आहे तर आधुनिकीकरणाची कल्पना निरपेक्ष (वस्तुनिष्ठ) आहे आधुनिकीकरणाची संकल्पना ही विविध पैलु असणारी कल्पना आहे. या संकल्पनेनुसार विचार, समाज, समुह, व्यक्ती अशा अनेक संदर्भात केला जातो. याशिवाय आर्थिक, राजकीय, सामाजिक, तांत्रिक, शैक्षणिक व प्रशासकीय अशा अनेक संदर्भातून आधुनिकीकरणाचा विचार होतो. आधुनिकीकरण ही सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. प्रारंभीच्या काळात ही संकल्पना अर्थव्यवस्थेतील बदल, त्याची सामाजिक मूल्ये व सामाजिक आचार ह्या अर्थाने वापरली गेली. भारतीय समाजाचे कृषीप्रधान

अर्थव्यवस्थेकडून उद्योग प्रधान अर्थव्यवस्थेकडे होणारे परिवर्तनाचे वर्णन करणारी एक प्रक्रिया हाच आधुनिकीकरणाचा अर्थ केला जात होता. परंतु आज ही कल्पना जास्त व्यापक अर्थाने वापरली जाते. आजच्या अर्थानि शास्त्र व तंत्रविद्या यांचा अंतर्भात असणारे सामाजिक परिवर्तन याचा उल्लेख करते. आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोन समाजात रुजविणे ह्या अर्थाची ही प्रक्रिया आहे. या परिवर्तनाचे स्वरूप बुद्धीनिष्ठ असे. यामधुन समाजाला अधिक चांगले व समाधानी जीवन जगता येते. विविध शोधांचा व्यक्ती व समाजाकडुन दैनंदिन जीवनात स्विकार केला जातो.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापर्यंत भारतीय समाज फार मोठया प्रमाणात परंपराधिष्ठित होता. अर्थात हळूहळू आधुनिकतेकडे वळण्याची इच्छा मुळ धरू लागली होती. या सुमारास आपल्या समाजात प्राचीन परंपरा सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करणारा एक गट होता व दुसरा समाजाला आधुनिकतेकडे नेऊ पहाणारा क्रियाशील गट होता. आणखी एक तिसरा गट होता जो परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधण्याच्या विचारांचा होता. या वला पारंपारिकता आणि आधुनिकता यांच्या सहअस्तित्वाची कल्पना मान्य होती. कारण परंपरेचा पूर्ण त्याग आणि आधुनिकतेचा पूर्णांशाने स्विकार ही कल्पना अपेक्षित असली तरी संभवनीय व व्यवहार्य नसते. आर्थिक पातळीवर भारतीय समाजाने तंत्रविद्येची वाढ आणि न्याय्य वितरण व्यवस्था हे ध्येय निश्चित केले. राजकीय पातळीवर प्रातिनिधीक शासन, लोकशाही संस्था. सत्ता अर्पित असण्याऐवजी संपादीत असण्याची कल्पना. लोकांचा शासनातील वाढता सहभाग यांचा विचार निश्चित झाला.

याचे परिणाम म्हणून आर्थिक पातळीवर उद्योगप्रधान व्यवस्थेचा स्विकार व विस्तार झाला. पारंपारिक बलुतेदार पद्धतीचा -हास होऊ लागला. राजकीय पातळीवर घराणेशाही एकाधिकारशाहीचे महत्व कमी झाले. सांस्कृतिक पातळीवर धर्मनिरपेक्ष मूल्यव्यवस्थेला अधिष्ठान मिळाले. सामाजिक दर्जा व भूमिका पळतीचे स्वरूप बदलले. व्यक्तीच्या गुणांना व कौशल्याला प्राधान्य देणारी विचारसरणी अस्तित्वात आली. ह्या आधुनिकीकरणाची गती फार जास्त नसली किंवा असमान असली तरीही जगाच्या स्पर्धेमध्ये समन्वयाची 'भूमिका टिकवून जे नवे आहे त्याची योग्य परिक्षा करून स्विकार करण्याचे तंत्र यात असल्याने आधुनिकीकरण हे योग्यच बदलांचा स्विकार करेल असे मान्य करणे अगत्याचे ठरते.